**कृपया प्रसिध्दिसाठी** **23 जून 2009**

# भारतीय जनता पार्टीचे नेते व माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. राम नाईक यांनी मुंबई येथे 23 जून 2009 रोजी पत्रकार परिषदेमध्ये वितरीत केलेले निवेदन

**मुंबई, मंगळवार :** आगामी रेल्वे अर्थसंकल्पात मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - 1 (एमयुटीपी) साठी रु. 1,374 कोटींची आणि प्रकल्प - 2 साठी रु. 1,700 कोटींची तरतूद करण्याच्या मागणी शिवाय अन्य नऊ कलमी मागण्यांचे पत्र भारतीय जनता पार्टी, मुंबईच्यावतीने रेल्वे मंत्री श्रीमती ममता बॅनर्जी यांना 22 जून रोजी दिल्ली येथे सादर करण्यात आले आहे. त्या निवेदनावर भाजपाचे नेते व माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. राम नाईक, मुंबई भाजपाचे अध्यक्ष व आमदार श्री. गोपाळ शेट्टी, खासदार प्रा. बाळ आपटे, माजी केंद्रिय मंत्री श्रीमती जयवंतीबेन महेता, माजी खासदार श्री. किरीट सोमय्या आणि मुंबई भाजपाचे उपाध्यक्ष श्री. रमेश मेढेकर यांच्या स्वाक्ष-या आहेत. रेल्वे मंत्री दिल्लीत नसल्यामुळे निवेदनासंबंधी रेल्वे बोर्डाचे सदस्य श्री. श्रीप्रकाश तसेच रेल्वे मंत्र्यांचे विशेष अधिकारी श्री. गौतम सन्याल यांच्याशी सर्वश्री राम नाईक, गोपाळ शेट्टी, प्रा. बाळ आपटे आणि रमेश मेढेकर यांनी चर्चा केली, अशी माहिती श्री. राम नाईक यांनी मुंबईत मंगळवारी योजलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

निवेदनात पुढील 11 मागण्या करण्यात आल्या असून रेल्वे अर्थसंकल्प तयार करताना त्यांचा विचार केला जावा अशी मागणी करण्यात आली आहे :-

1. **एमयुटीपी - 1 :** वाजपेयी सरकारच्या काळामध्ये मुंबई रेल्वे विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली होती. रु. 4,174.40 कोटींच्या विविध योजना एमयुटीपी - 1 योजने अंतर्गत वर्ष 2006 पर्यंत पूर्ण करावयाच्या होत्या. परंतु मार्च 2009 पर्यंत या सर्व योजनांवर सुमारे रु. 2,800 कोटीच खर्च झाले आहेत. त्यामुळे हे सर्व प्रकल्प या वर्षात पूर्ण व्हावेत यासाठी येत्या बजेट मध्ये रु. 1,374 कोटींची तरतूद करावी.
2. **एमयुटीपी - 2 :** वर्ष 2008-2009 च्या रेल्वे अर्थसंकल्पात एकूण रु. 5,300 कोटींच्या योजना असलेल्या एमयुटीपी -2 ला मान्यता देण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात 31 मार्च 2009 पर्यंत एमयुटीपी - 2 वर फक्त रु. 10 कोटी खर्च करण्यात आले आहेत. या वर्षीच्या रेल्वे अर्थसंकल्पात एमयुटीपी -2 साठी किमान रु. 1,700 कोटींची तरतूद करावी तसेच आगामी तीन वर्षात या सर्व योजना पूर्ण कराव्यात.
3. **विरार-डहाणू रोड मार्गाचे रुंदीकरण :** एमयुटीपी - 1 अंतर्गत रु. 50 कोटींच्या विरार-डहाणू रोड मार्गाच्या रुंदीकरणाला सर्वाधिक प्राधान्यता द्यावी. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उपनगरी रेल्वे गाडी चर्चगेटहून थेट डहाणू रोड पर्यंत जाऊ शकेल. सुधारीत वेळापत्रकानुसार हा प्रकल्प जून 2009 पर्यंत पूर्ण व्हावयास हवा होता, परंतु तो रखडला आहे. तो युध्द पातळीवर पूर्ण करण्यात यावा.

4. **नवीन रेल्वे गाड्यांची खरेदी :** रु. 1,751 कोटींच्या 12 डब्यांच्या नव्या 129 गाड्या डिसेंबर 2009 पर्यंत आणण्यात येणार आहेत. प्रत्यक्षात फक्त 51 नव्या गाड्या आल्या असून 78 गाड्या अद्यापही यावयाच्या आहेत. एवढेच नव्हे तर आलेल्या गाड्यांपैकी अनेक गाड्या सदोष आहेत. सुधारित वेळापत्रकाप्रमाणे नव्या गाड्या येतील याकडे विशेष लक्ष पुरविण्यात यावे.
5. **हार्बर मार्ग :** मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गामध्ये आमूलाग्र सुधारणा करण्याची गरज आहे. या मार्गावरुनही 12 डब्यांच्या तसेच जलद गाड्या धावाव्यात यासाठी योग्य तरतूद करण्यात यावी.
6. **वसई-पनवेल शटल गाड्या :** वसई -दिवा - पनवेल शटल गाड्यांच्या फे-या वाढविण्याची गरज आहे एवढेच नव्हे तर सदर सेवा वसई ऐवजी विरार पासून करण्याची गरज आहे. असे केल्यास डहाणू रोडहून येणा-या प्रवाशांना विरार आणि वसई या ठिकाणी दोनदा गाड्या बदलण्याची आवश्यकता राहणार नाही.
7. **महिला विशेष गाड्या :** प्रतिसाद नाही असे खोटे कारण दाखवून पश्चिम रेल्वेवरील एक महिला विशेष गाडी रद्द करण्यात आली होती. सकाळ - संध्याकाळ गर्दीच्या वेळी एक पश्चिम रेल्वेवर तर एक मध्य रेल्वेवर अतिरिक्त महिला विशेष गाडी सुरु करण्यात यावी.
8. **कोंकण रेल्वे :** बोरीवली ते डहाणू रोड दरम्यान पश्चिम रेल्वेवर वाढलेल्या लोकसंख्येच्या सोयीसाठी बोरीवलीहून वसई मार्गे कोंकण, गोवा, कर्नाटक येथे जाणा-या गाड्या सुरु करण्यात याव्यात.
9. **प्रवास भाडे :** गेल्या दोन अर्थसंकल्पांमध्ये द्वितीय श्रेणीचे भाडे कमी करण्यात आले होते. तथापि दररोजच्या 1.20 कोटी प्रवाश्यांपैकी मुंबई, कोलकाता, चेन्नई येथील एकूण 95 लाख (78 टक्के) उपनगरी प्रवाश्यांकडे दोन्ही वेळी साफ दुर्लक्ष करण्यात आले आहे. हा सापत्न भाव थांबवून त्यांनाही रेल्वे भाड्यात सवलत द्यावी.
10. **रेल्वे प्रवाश्यांसोबत संवाद :** मुंबईतील प्रवासी अनेक सुधारणा तपशीलवार सूचवू इच्छितात. त्यासाठी रेल्वे मंत्र्यांनी मुंबईत येऊन मुंबईतील प्रवासी संघटनांशी संवाद साधावा.
11. **बॉम्बस्फोटपीडितांसाठी जनता दरबार :** वर्ष 2006 मध्ये पश्चिम रेल्वेवर झालेल्या बॉम्ब स्फोट मालिकांमध्ये अनेक ठार झाले तर कित्येक जखमी झाले. अनेकांना सानुग्रह अनुदान मिळाले असले तरीही कित्येक प्रकरणे अद्यापही प्रलंबित आहेत. या सर्व बॉम्बस्फोटपीडितांसाठी रेल्वे मंत्र्यांनी मुंबईत येऊन जनता दरबार घ्यावा.

रेल्वे मंत्री श्रीमती ममता बॅनर्जी रेल्वे अर्थसंकल्पाद्वारे मुंबईतील उपनगरी रेल्वे प्रवाशांना दिलासा देतील अशी अपेक्षाही श्री. राम नाईक यांनी पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केली.

**(कार्यालय सचिव)**